गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २४५ वा ● बुधवार २४ जानेवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 245 | Date : 24/01/2024 | blow :Wednesday | Page 4 | Price 4

# महाराष्ट्र ओरबडला जातोय अन् मिंधे दिल्लीसमोर शेपूट हलवतो

### उद्धव ठाकरेंची मुख्यमंत्री शिंदेंवर बोचरी टीका

नाशिक : नाशिक येथील गोल्फ मैदानात झालेल्या ठाकरे गटाच्या जाहीर सभेत शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर बोचरी टीका केली आहे. महाराष्ट्र ओरबडला जात असताना मिंधे दिल्लीसमोर शेपूट हलवत असल्याची टीका ठाकरे यांनी केली. यावेळी उद्धव यांनी पंतप्रधान मोदी हे गुजरात आणि भारतामध्ये भिंत उभी करत असल्याचे म्हटले. शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे महाअधिवेशन नाशिकमध्ये पार पडले. या अधिवेशनाची सांगता गोल्फ मैदानातील जाहीर सभेने झाली. यावेळी शिवसेना ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर तोफ डागली.



उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, पंतप्रधान मोदी हे देश आणि गुजरात मध्ये भिंत उभी करत आहेत.भाजपकडून महाराष्ट्र लुटला जात आहे, ओरबडला जातोय. मिंध्ये तुझ्यासमोर महाराष्ट्र लुटला जातोय आणि दिल्ली समोर शेपूट हलवत आहे अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी घणाघाती टीका केली.

उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदीवरही हल्लाबोल केला. त्यांनी म्हटले की, मोदींचे दौरे वाढले आहेत. जेव्हा महाराष्ट्र संकटात होता तेव्हा मोदी आले नाही. निवडणूक आली तेव्हा महाराष्ट्र आठवतोय. मणिपूरला लोकसभेच्या दोन जागा म्हणून तिकडे गेले नाहीत. इकडे ४८ जागा म्हणून येतात. महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले. तेव्हा राज्य सरकारने मागणी करून ही निधी दिला नाही. पण, गुजरातला न मागताही निधी दिला. हिंदूमध्ये विष पेरतात.भेदभाव करतात. देशासाठी 'मन की बात' गुजरातसाठी 'धन की बात' करता अशा शब्दात ठाकरे यांनी हल्लाबोल केला. मोदी देश आणि गुजरातमध्ये भिंत उभी करत आहेत. मोदी हे योग्य नाही, असलं हिंदुत्व आम्हाला मान्य नाही असेही ठाकरे यांनी म्हटले.

उद्धव ठाकरे यांनी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर तपास यंत्रणांकडून होत असलेल्या कारवाईवर भाष्य केले. त्यांनी म्हटले की, माझ्याकडे कार्यकर्ते पळणारे नाहीत. माझ्या कार्यकर्त्यांच्या घरी धाडी घालतात.घर कार्यकर्त्यांचे आणि त्यामध्ये हे अधिकारी तंगड्या पसरून बसतात.आमचे सरकार आल्यावर ह्याच तंगड्या गळ्यात घालणार असल्याचाही हल्लाबोल ठाकरे यांनी केला. भाजप म्हणजे भेकड जनता पार्टी आहे. यंत्रणांचा वापर करतात,आमचे संरक्षण काढले हे समोर माझे (शिवसैनिक) सुरक्षा कवच असल्याचे त्यांनी म्हटले.

# मराठा आरक्षणासाठी आज मोठा दिवस

### सुप्रीम कोर्टात क्युरेटीव्ह याचिकेवर आज होणार सुनावणी

मुंबई : आरक्षणासाठी मराठा समाज मुंबईच्या दिशेने कूच करत असताना दुसरीकडे आजचा दिवस मराठा आरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारने दाखल केलेल्या क्युरेटीव्ह याचिकेवर आज सुनावणी होणार आहे. आज दुपारी एक वाजण्याच्या सुमारास ही सुनावणी होणार आहे.

काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणावरील क्युरेटिव्ह याचिका स्विकारली होती. त्यानंतर आज सुनावणी होणार आहे. ही सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. संजीव खन्ना आणि न्या. बी. आर. गवई यांच्या दालनात बंद दाराआड होणार आहे.

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर राज्य सरकारने दाखल केलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर काही दिवसांपूर्वी सुप्रीम कोर्टात सुनावणी पूर्ण झाली होती. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर इन-चेंबर ही सुनावणी पार पडली होती. दरम्यान, यावेळी राज्य सरकारने सुनावणीत आपली भूमिका मांडली होती. त्यामुळे, या प्रकरणावर सुप्रीम कोर्ट लवकरच आपला निकाल देण्याची शक्यता वर्तवली जात होती. ज्यात क्युरेटिव्ह पिटिशन स्वीकारले जाणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, या सुनावणीमध्ये सर्वोच्च




न्यायालयाने मराठा आरक्षणावरील क्युरेटीव्ह याचिका स्विकारली.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाला मंगळवारपासून (२३ जानेवारी) सुरुवात झाली. मात्र, गोखले इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणासाठी तयार करण्यात आलेली मोबाईल पमध्ये पहिल्याच दिवशी तांत्रिक समस्या उद्भवली. सर्वेक्षण करणाऱ्या प्रगनकांना मोबाईल प्लिकेशनमध्ये लॉगिन होताना अडथळा येत आहे. त्यामुळे लॉगिन होत नाही. परिणामी हे सर्वेक्षण अनेक ठिकाणी बंद पडल्याचे चित्र होते.

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी यापूर्वी आंतरवाली सराटीत आमरण उपोषण केले. यावेळी दोनदा जरांगे यांनी सरकारला वेळ दिला होता. मात्र, त्यानंतर देखील मराठा आरक्षणाचा प्रश्न काही सुटला नाही. त्यामुळे आता मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानावर अमरण उपोषण करण्याची घोषणा केली आहे.

यासाठी २० जानेवारीपासून त्यांनी पायी दिंडी काढली आहे. जरांगे यांनी मुंबई आंदोलन स्थगित करावं अशी मागणी सत्ताधारी नेतेमंडळी आणि मंत्र्यांकडून केली जात आहे. मात्र, आतापर्यंत सरकारला सात महिन्याचा वेळ दिला, यापुढे आता एक तास ही मिळणार नाही, आम्ही मुंबईत आंदोलन करणारच या भूमिकेवर मनोज जरांगे ठाम आहेत.

### अटल सेतू, अयोध्या राम मंदिरानंतर आणखी एक मोठा प्रकल्प देशाच्या सेवेत

# दोन मार्ग जोडणाऱ्या रेल्वे लिंकला पंतप्रधान मोदी दाखवणार हिरवा झेंडा

नवी दिल्ली: जानेवारी महिन्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते मुंबईतील अटल सेतू आणि अयोध्येतील राम मंदिराचं उद्घाटन करण्यात आलं. त्यानंतर आता या उद्घाटनाची मालिका सुरूच असून गुरुवारी अशाच आणखी एका प्रकल्पाला मोदी हे हिरवा झेंडा दाखवणार आहेत. त्यामुळे प्रवासी रेल्वे गाड्यांना होणारा विलंब दूर होईल आणि देशातील लॉजिस्टिक खर्चात लक्षणीय घट होईल. देशातील ईस्टर्न आणि वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर (DFC) ला जोडणाऱ्या इलेक्ट्रिक दुहेरी रेल्वे मार्गाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी उद्घाटन करणार आहेत. ही रेल्वे लिंक न्यू खुर्जा जंक्शन ते रेवाडी रेल्वे स्थानकाला जोडणार आहे.



देशातील दोन डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरला (DFC) जोडणारी ही रेल्वे लिंक १७३ किलोमीटर लांब आहे. यासाठी १०,१४१ कोटी रुपये खर्च आला आहे. ती नोएडातील न्यू बोराकी येथून सुरू होईल आणि या मार्गावर न्यू दादरी, न्यू फरिदाबाद, न्यू पृथला, न्यू तवाडू आणि न्यू धारुहेरा अशी सहा स्थानके असतील.

दोन्ही डीएफसी या रेल्वे लिंकद्वारे जोडल्या जातील, ज्यामुळे माल गाड्यांच्या वाहतुकीत लागणारा वेळ कमी होईल. त्यामुळे मालवाहतुकीचा खर्चही कमी होईल. एवढेच नाही तर खुर्जा ते रेवाडी दरम्यान लागणारा वेळ २० तासांनी कमी होईल. डीएफसीच्या निर्मितीनंतर देशातील मालगाड्यांना गाझियाबाद आणि दिल्लीच्या गजबजलेल्या एनसीआर भागातून जावे लागणार नाही.

या भागावर एक किलोमीटर लांबीचा दुहेरी रेल्वे बोगदाही बांधण्यात आला आहे. जगातील हा अशा प्रकारचा पहिला बोगदा आहे. या बोगद्यातून । पान २ वर

# कॅप्टिव्ह मार्केट योजना : साडी वाटपाचे जिल्हानिहाय कालबद्ध नियोजन करावे

### वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील



मुंबई : वस्त्रोद्योग विभागाने एकात्मिक व शाश्र्वत वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. या धोरणानुसार राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबाला दर वर्षी एक साडी मोफत देण्यासाठी 'कॅप्टिव्ह मार्केट योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेला अधिक गती देऊन तातडीने साडी वाटप होईल यासाठी जिल्हानिहाय कालबद्ध नियोजन करावे, अशा सूचना वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या. मंत्रालयात आज वस्त्रोद्योग विभाग आणि अन्न नागरी पुरवठा विभागाची एकत्रित कॅप्टिव्ह मार्केट योजनेअंतर्गत साडी वाटप नियोजनाबाबत आढावा बैठक वस्त्रोद्योग मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी वस्त्रोद्योग विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, वस्त्रोद्योग आयुक्त गोरक्ष गाडीलकर, उपसचिव कृष्ण पवार, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी, उपसचिव व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

ही योजना २०२३ ते २०२८ या पाच वर्षांसाठी निश्र्चित करण्यात आली असून राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना वस्त्रोद्योग विभागामार्फत यंत्रमागावर विणलेली प्रति कुटुंब एक साडीचे रेशन दुकानावर मोफत वाटप करण्यात येणार आहे. त्याचा लाभ जवळपास । पान २ वर

# राज्यात नवमतदारांच्या संख्येत वाढ : मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

### संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम महत्त्वाचा, नागरिकांनी मतदार यादीत नावे अद्ययावत करावीत

मुंबई : निवडणूक आयोगाद्वारे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २७ ऑक्टोबर २०२३ ते २३ जानेवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात आला होता. त्यानुसार मतदार यादी आज अंतिम करण्यात आली आहे. ही यादी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच मतदार नोंदणी अधिकारी, मतदान केंद्रावर तसेच निवडणूक आयोगाच्या https://electoralsearch.eci.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच राजकीय पक्षांना देखील ही यादी देण्यात येणार आहे. मतदारांनी या यादीत आपले नाव असल्याची खातरजमा करून घ्यावी. आपल्या तपशीलात काही बदल करायचा असल्यास विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली असली तरी अद्ययावतीकरण प्रक्रिया ही निरंतर सुरू राहणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिली.



यंदा राज्यात लोकसभा आणि विधानसभा या दोन महत्त्वाच्या निवडणुका होणार आहेत, या पार्श्र्वभूमीवर राज्यात मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, तसेच घरोघरी सर्वेक्षणाची मोहीम राबवण्यात आली होती. या मोहिमेअंतर्गत मतदारांची यादी अद्ययावत करण्यात आली असून, याबाबत आज मंत्रालयात पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देशपांडे यांनी माहिती दिली.

श्री. देशपांडे म्हणाले की, निवडणुका पारदर्शक आणि न्याय्य वातावरणात होण्यासाठी मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण महत्त्वपूर्ण असते. या वर्षीच्या महत्वाच्या निवडणुकांसाठी मतदार यादी अद्ययावत करून, संकेतस्थळावर व मतदार केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच प्रारूप याद्या प्रसिद्ध करणार असून, मतदारांनी आपले नाव जुन्या मतदान केंद्रात नाव नसल्यास नजीकच्या मतदार केंद्रात असल्याची खात्री करून घ्यावी किंवा व्होटर हेल्प लाईन पवर जाऊन मतदान केंद्राचा पर्याय निवडावा व आपले नाव असल्याची खात्री करून घ्यावी. मतदार ऑनलाईन पद्धतीनेही नाव नोंदवू शकतात त्याचाही मोठ्या प्रमाणात मतदारांनी । पान २ वर

# राहुल गांधी, कन्हैय्याकुमार यांच्याविरोधात आसाममध्ये एफआयआर दाखल

मुंबई : काँग्रेस नेते राहुल गांधी आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्यातील संघर्ष आता आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. आसाममध्ये भारत जोडो न्याय यात्रेला परवानगी न देण्याची भूमिका आसाम सरकारने घेतली असताना दुसरीकडे राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस नेत्यांनी भाजप सरकारचे आव्हान स्वीकारले आहे. मंगळवारी, सकाळच्या सुमारास झालेल्या पोलिसांसोबतच्या झटापटीनंतर राहुल गांधी, के.सी. वेणुगोपाल, कन्हैय्याकुमार यांच्यासह काँग्रेस नेत्यांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी ट्वीट करून काँग्रेस नेत्यांविरोधात एफआयआर दाखल झाल्याची माहिती दिली आहे. काँग्रेसच्या सदस्यांनी हिंसाचार, चिथावणी देणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला. त्याशिवाय पोलिसांवर हल्ला केल्याप्रकरणी राहुल गांधी, केसी वेणुगोपाल, कन्हैया कुमार आणि इतर लोकांविरुद्ध कलम १२० (बी) १४३/१४७/१८८/२८३/४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती मुख्यमंत्री बिस्वा यांनी दिली. त्याशिवाय पीडीपीपी कायद्यातील कलम ३५३ (लोकसेवकावर हल्ला), कलम ३३२ (लोकसेवकाला कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी स्वेच्छेने गंभीर दुखापत करणे), आणि कलम ३३३ (लोकसेवकाला कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी स्वेच्छेने गंभीर दुखापत करणे) आदींसारखे अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याआधी मंगळवारी (२३ जानेवारी) राहुल गांधींच्या भारत जोडो न्याय यात्रेला गुवाहाटीत प्रवेश करण्यापासून रोखण्यात आले होते. यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलन करत बॅरिकेड्स तोडले. डीजीपींना गुन्हा नोंदवण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्री बिस्वा सरमा यांनी म्हटले की, हिंसा ही आसामच्या संस्कृतीचा भाग नाही. आम्ही शांतताप्रिय राज्य आहोत. असे नक्षलवादी डावपेच आपल्या संस्कृतीच्या पूर्णपणे विरुद्ध आहेत. तुमच्या बेजबाबदार वृत्तीमुळे आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्यामुळे गुवाहाटीच्या रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाल्याचे त्यांनी म्हटले.



# स्थानिक 'शिवप्रेमीं'च्या सहकार्य, समन्वयातून शिवनेरीवरील 'महादुर्ग' महोत्सव यशस्वी करा : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून किल्ले शिवनेरी परिसरात आयोजित 'महादुर्ग २०२४' महोत्सव सर्वांना सोबत घेऊन भव्य-दिव्य प्रमाणात साजरा व्हावा. महोत्सव यशस्वी करण्यासाठी नियोजनात स्थानिकांचा सहभाग वाढवावा. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन नियोजन करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त दि. १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान राज्याच्या पर्यटन विभागाच्यावतीने जुन्नर येथील शिवनेरी किल्ला परिसरात आयोजित करण्यात आलेल्या 'महादुर्ग २०२४' महोत्सवाच्या तयारीचा । पान २ वर



## संपादकीय

### काँग्रेसला पेलावे लागणार आहे

लोकसभा निवडणुकीमध्ये आव्हान देण्यासाठी स्थापन झालेल्या सर्व विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व काँग्रेस पक्षाकडे आले आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांना या आघाडीचे अध्यक्षही करण्यात आले आहे. काँग्रेस पक्षासाठी ही आनंदाची आणि समाधानाची बाब असली तरी त्याचवेळी या जबाबदारी पाठोपाठ येणारी आव्हानेही काँग्रेसला आणि खर्गे यांना लक्षात घ्यावी लागणार आहेत. अलीकडेच 'इंडिया' आघाडीची जी बैठक झाली त्याला काही प्रमुख घटक पक्षांनी पाठ फिरवली होती. इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे लोकसभा निवडणुकीतील जागावाटप निश्चित करण्यासाठी ही बैठक बोलवण्यात आली होती. पण या बैठकीत हा निर्णय होऊ शकला नाही. मात्र, या आघाडीचे नेतृत्व काँग्रेस आणि खर्गे यांच्याकडे आल्यामुळे आता आगामी कालावधीमध्ये होणाऱ्या बैठकांमध्ये जागा वाटपावर तोडगा काढण्याचे आव्हान काँग्रेसपुढे आहे. काँग्रेस हा सर्वात जुना पक्ष असला तरी या पक्षाची विद्यमान कामगिरी लक्षात घेता या पक्षाने थोडी पडती बाजू घ्यायला हवी, असे स्पष्ट मत तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केले होते. पश्चिम बंगालसारख्या मोठ्या राज्यामध्ये काँग्रेसला क्त दोन जागा देण्याची तयारी ममता यांनी दाखवली होती. त्याचवेळी पश्चिम बंगालमध्ये कायदा व सुव्यवस्था लक्षात घेता या राज्यात राष्ट्रपती राजवट जारी करावी, अशी मागणी काँग्रेसचे नेते अधिर रंजन चौधरी यांनी केली आहे. साहजिकच इंडिया आघाडीचे नेतृत्व जरी काँग्रेसकडे आले असले तरी घटक पक्षांना व्यवस्थितपणे सांभाळण्याचे मोठे काम आता काँग्रेस नेतृत्वाला करावे लागणार आहे. या सर्व आघाडीतील घटक पक्षांची मोळी बांधत असताना त्या प्रत्येकाचे समाधान कसे होईल हे काँग्रेसला पाहावे लागणार आहे. ममता बॅनर्जी यांनी म्हटल्याप्रमाणे काही वेळा काँग्रेसला पडती भूमिका घ्यावी लागणार आहे. उत्तर प्रदेशसारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या राज्यामध्ये काँग्रेसची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्या ठिकाणी जागा वाटपामध्ये मोठा वाटा काँग्रेसला मिळण्याची कोणतीही शक्यता नाही. या राज्यामध्ये अत्यंत प्रभावशाली असलेला अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्षही जागा वाटपामध्ये काँग्रेसबाबत तडजोडीची भूमिका घेईल, असे वाटत नाही. काँग्रेस पक्षाचा प्रभाव देश पातळीवर वाढवण्याचे काम करत असतानाच इंडिया आघाडी एकसंध राहील अशा प्रकारे काम करण्याचे वेगळे आव्हान आगामी कालावधीमध्ये काँग्रेसला पेलावे लागणार आहे

## नाचणीचे आहे आहारात महत्व!

आरोग्यदृष्ट्याही नाचणी या तृणधान्याला महत्त्व आहे.मानवी आहारात वापरल्या जाणाऱ्या तृणधान्य पिकामध्ये भात व गहू या प्रमुख धान्याचा समावेश होतो. इतर भरड धान्य पिकांमध्ये ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, कोडो, कुटकी, बरटी व वरई या पिकांचा समावेश होतो. राज्यात ज्वारी, बाजरी, नाचणी आणि वरई या पिकांची लागवड केली जाते. साधारणपणे २० व्या शतकाच्या पूर्वार्धात आणि पारंपरिक दृष्ट्या या पिकांची लागवड आणि उत्पादन आपल्या देशात घेतले जात होते आणि आपल्या दैनंदिन आहार पद्धतीत या धान्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत होता. कालांतराने भात आणि गहू या पिकांचे अधिक उत्पादन आणि उपलब्धता वाढल्याने व आहार पद्धतीत झालेल्या बदलामुळे आजच्या काळात या भरडधान्य पिकांखालील क्षेत्र कमी होत आहे. राज्यात या खरीप हंगामात लागवड केल्या जाणाऱ्या अन्नधान्य पिकांपैकी नाचणी महत्वाचे तृणधान्य पीक आहे. नाचणी/नागली (Finger millet) हे गवतवर्गीय कुळातील पीक असून याचे शास्त्रीय नाव (इलुसिन कोराकाना) Eleusine coracana असे आहे.

**नाचणी पिकाची वाढ व सामान्य माहिती:** नाचणी हे गवतवर्गीय कुळातील (Poaceae) महत्वाचे पीक आहे. त्यामुळे या पिकाची वाढ होताना मुख्य खोडासोबत फुटवे येण्याचा गुणधर्म आहे. या धान्याचा आकार लहान असून आकार हे एकदलवर्गीय पीक आहे. या पिकामध्ये स्वपरागीभवन प्रक्रियेदवारे बीज निर्मिती होते. सर्वच भरड धान्य पीके ही बदलत्या हवामानास अनुकूल पिके आहेत. या पिकांमध्ये सी४ पद्धतीने प्रकाश संश्लेषण (मका, ऊस, ज्वारी) होते. त्यामुळे पानाद्वारे अन्ननिर्मिती करताना प्रकाश, पाणी व कार्बन डायऑक्साइडचा सुयोग्य वापर या वनस्पतीमध्ये केला जातो. तसेच प्रतिकूल परिस्थितीत वाढीची उत्कृष्ठ वैशिष्ट्ये जसे की, कमी उंची, पानांचा लहान आकार, कणिस व पाने यामध्ये अन्नपदार्थ पुरविण्यासाठी योग्य पद्धत, तंतूमय मुळांची खोल वाढ व प्रतिकूल परिस्थितीत तग धरण्याचा गुणधर्म यामुळे या पिकांचे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व



आहे.

**नाचणी पिकाच्या कणसातील विविधता:** नाचणीच्या कणसामध्ये मोठ्या प्रमाणात विविधता आढळते. हाताच्या बोटाप्रमाणे असलेल्या अनेक पाकळ्यांचे नाचणीचे कणीस तयार होते. प्रत्येक पाकळीमध्ये समांतर पद्धतीने फुले येतात. त्यापासून धान्य निर्मिती होते. फुलांच्या एका गुच्छामध्ये असलेली लहान आकाराची फुले पहाटेच्या वेळी उमलतात, त्यामुळे प्रामुख्याने फक्त स्वपरागीभवन पद्धतीने बीज निर्मिती होते. विविध स्थानिक भागात कणसामध्ये पाकळ्यांच्या रचनेनुसार विविधता आढळते. त्यामध्ये प्रामुख्याने बंद कणीस, थोडे उघडलेले, अर्धवट उघडे, पूर्ण उघडे असे प्रकार आढळतात. नाचणीच्या धान्याचा रंग हा प्रामुख्याने लालसर तपकिरी असतो. काही प्रमाणात पांढऱ्या रंगाच्या नाचणी वाणांची देखील लागवड केली जाते.

**नाचणी: पौष्टिक गुणधर्म : अ) प्रथिने व खनिज पदार्थ:** नाचणी व तत्सम तृणधान्य वर्गातील पिकांमध्ये पुढील प्रमाणे पौष्टिक तत्वे असतात. त्यात मानवी आहाराच्या दृष्टीने नाचणी हे एक अत्यंत महत्वाचे पौष्टिक तृणधान्य आहे. नाचणीमध्ये कॅल्शियम (३६४ मि.ग्रॅ./१०० ग्रॅम) या खनिजाचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे भात आणि गहू धान्याच्या तुलनते १० पटीने अधिक आहे. त्याचबरोबर मॅग्नेशियम (१४६ मि.ग्रॅ./१०० ग्रॅम) व लोह (४.६२ मि.ग्रॅ./१०० ग्रॅम) या खनिजाचे प्रमाण भात आणि गहू या धान्यापेक्षा अधिक आहे.

**ब) जीवनसत्वे:** या पिकाचे आणखी वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म म्हणजे या पिकांमध्ये मुबलक असलेले जीवनसत्वाचे प्रमाण. नाचणी धान्यामध्ये जीवनसत्व थायमिन बी-१ (०.३७ मि.ग्रॅ./१०० ग्रॅम), रायबोफ्लेवीन बी-२ (०.१७ मि.ग्रॅ./१०० ग्रॅम) व फॉलिक असिड (३४.६६ ग.ग्रॅ./१०० ग्रॅम) याचे प्रमाण भात आणि गव्हापेक्षा पेक्षा जास्त आहे.

आहारातील महत्व: नाचणी- Finger millet (शास्त्रीय नाव: Eleusine coracana):

नाचणी हे एक पौष्टिक आणि आरोग्यदायी धान्य आहे. त्याचे काही पौष्टिक आणि आरोग्यदायी फायदे आहेत: पोषक तत्वांनी समृद्ध: नाचणी हे कार्बोहायड्रेट्स, आहारातील तंतूमय पदार्थ, प्रथिने, जीवनसत्वे आणि खनिजांसह आवश्यक पोषक तत्वांचा एक चांगला स्रोत आहे. त्यात कॅल्शियम, लोह आणि फॉस्फरसचे प्रमाण विशेषत: जास्त असते. आहारातील तंतूमय पदार्थांचे उच्च प्रमाण: हे आहारातील तंतूमय पदार्थांचा उत्कृष्ट स्रोत आहे, जे पाचन आरोग्यासाठी महत्वाचे आहे. तंतूमय पदार्थांमुळे बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करते, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल डिसऑर्डरचा धोका कमी करते आणि पोट भरून ठेवते. वजन व्यवस्थापन मदत करते. ग्लूटेन-मुक्त: नाचणी नैसर्गिकरित्या ग्लूटेन-मुक्त आहे, ज्यामुळे सेलिआक रोग किंवा ग्लूटेन संवेदनशीलता असलेल्या व्यक्तींसाठी एक आदर्श पर्याय बनतो.

अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध: यामध्ये फिनोलिक संयुगे आणि फ्लेव्होनॉइड्ससह विविध प्रकारचे अँटिऑक्सिडंट असतात, जे शरीराला ऑक्सिडेटिव्ह तणावापासून संरक्षण करण्यास आणि जुनाट आजारांचा धोका कमी करण्यास मदत करतात. रक्तातील साखर संतुलित करते: नाचणीचा ग्लायसेमिक निर्देशांक कमी असतो. याचा अर्थ रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढू शकत नाही. हे मधुमेह असलेल्या लोकांसाठी किंवा रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेऊ पाहणाऱ्यांसाठी एक चांगली निवड बनवते. हृदयाचे आरोग्य: धान्यामध्ये तंतूमय पदार्थ, अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्स असल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करून आणि हृदयविकाराचा धोका कमी करून हृदयाच्या आरोग्यासाठी योगदान देऊ शकते. हाडांचे आरोग्य: नाचणीमध्ये कॅल्शियम या खनिजाचे प्रमाण इतर भात, गहू, ज्वारी, बाजरी या सर्व तृण धान्यापेक्षा सर्वाधिक आहे. त्याच बरोबर फॉस्फरस आणि मॅग्नेशियम सारखी इतर खनिजे भरपूर प्रमाणात असतात, जे मजबूत आणि निरोगी हाडे राखण्यासाठी आवश्यक असतात. गर्भधारणेसाठी पौष्टिक: उच्च लोह सामग्रीमुळे, गर्भवती महिलांसाठी अशक्तपणा टाळण्यासाठी आणि गर्भाच्या निरोगी विकासास प्रोत्साहन देण्यासाठी फायदेशीर आहे. वजन व्यवस्थापन: नाचणीमधील उच्च फायबर सामग्रीमुळे तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटू शकते, एकूण कॅलरीचे सेवन कमी होते आणि वजन व्यवस्थापनात मदत होते. रोगप्रतिकारशक्ती सुधारते: नाचणीतील पोषक तत्वे, विशेषत: अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे, रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि शरीराला संक्रमण आणि रोगांशी लढण्यास मदत करतात. आतड्यांचे आरोग्य: नाचणीतील आहारातील तंतूमय पदार्थ देखील निरोगी आतड्यांतील जीवाणूंच्या वाढीस व कार्यक्षमतेस प्रोत्साहन देते, जे संपूर्ण आरोग्यासाठी आवश्यक आहे. पचण्यास सोपे: नाचणी धान्य सहज पचण्याजोगे आहे, ज्यामुळे पचन संवेदनशीलता असलेल्या लोकांसाठी हा एक चांगला पर्याय आहे.

(संदर्भ:- डॉ.योगेश बन व डॉ.अशोक पिसाळ, अखिल भारतीय समन्वीत नाचणी व तत्सम तृणधान्य संशोधन प्रकल्प, विभागीय कृषी संशोधन केंद्र, कोल्हापूर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)

**श्री.दत्तात्रय कोकरे, विभागीय संपर्क अधिकारी**

पान १ वरुन

### दोन मार्ग जोडणाऱ्या रेल्वे लिंकला

डबल डेकर कंटेनरही सहज जाऊ शकतात. हा रेल्वे दुवा दादरी येथे ४.५४ किमी लांबीच्या रेल्वे उड्डाणपुलाद्वारे (RFO) DFC ला भारतीय रेल्वेशी जोडतो.

याआधी पंतप्रधान मोदींनी जानेवारीच्या सुरुवातीला देशाची आर्थिक राजधानी मुंबईतील अटल सेतूचेही उद्घाटन केलं होतं. त्यामुळे मुंबई ते नवी मुंबई हे अंतर कापण्यासाठी लागणारा वेळ दोन तासांवरून केवळ २० मिनिटांवर आला आहे. त्याचबरोबर मुंबईतील उत्तर-दक्षिण ते पूर्व ते पश्चिम प्रवासाची पद्धतही बदलली आहे. ते देशात बांधल्या जात असलेल्या 'दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे कॉरिडॉर'शी जोडलेले आहे, ज्यामुळे मुंबई आणि नवी मुंबईतील आर्थिक क्रियाकलापांना चालना मिळेल.

### राज्यात नवमतदारांच्या संख्येत वाढ

वापर करावा. ज्या युवकांचे वय एप्रिल महिन्यात १८ वर्षे पूर्ण होणार आहेत, अशा तरुणांनी आगाऊ नोंदणी करण्यात सांगितले होते. त्यांनाही एप्रिल नंतर मतदान करता येणार आहे. यामुळे मतदारांच्या संख्येत वाढ होणार असल्याचेही श्री. देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर २०२३ प्रारुप मतदार यादीत २४ लाख ३३ हजार ७६६ मतदारांची नाव नोंदणी झाली. तसेच २० लाख २१ हजार ३५० मतदारांची नावे वगळण्यात आली. त्यामुळे अंतिम मतदार यादीमध्ये ४ लाख १२ हजार ४१६ मतदारांची निव्वळ वाढ (छर्शी -वव्ळींळेप) होऊन एकूण मतदारांची संख्या ९ कोटी १२ लाख ४४ हजार ६७९ इतकी झालेली आहे. त्यानुसार १ लाख ०१ हजार ८६९ पुरुष मतदार तर ३ लाख ०८ हजार ३०६ स्त्री मतदारांची आणि ५७२ तृतीयपंथी मतदारांची वाढ झालेली आहे. महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, गृहनिर्माण सोसायट्या यांच्या सहकार्यामुळे यंदा महिलांच्या मतदार नोंदणीत लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे मतदार यादीतील स्त्री-पुरुष गुणोत्तर ९१७ वरून ९२२ इतके झाले आहे.

या पुनरीक्षण कार्यक्रमामध्ये १८ ते १९ या वयोगटामध्ये ६ लाख ७० हजार ३०२ मतदारांची नव्याने भर पडली आहे, तसेच २० ते २९ या वयोगटात ८ लाख ३३ हजार ४९६ मतदारांची वाढ झालेली आहे. प्रारूप यादीत १८ ते १९ या वयोगटाची मतदार संख्या ३ लाख ४८ हजार ६९१ (०.३८ टक्के) होती, ती जानेवारीच्या अंतिम मतदार यादीत १० लाख १८हजार ९९३ (१.१२ टक्के) इतकी झालेली आहे. तर २० ते २९ वयोगटाची प्रारूप यादीतील मतदार संख्या १ कोटी ५५ लाख ११ हजार ३७६ (१७.८ टक्के) होती, ती अंतिम यादीत १ कोटी ६३ लाख ४४ हजार ८७२ (१७.९१ टक्के) इतकी झालेली आहे. विविध सामाजिक संस्था, महाविद्यालये यांनी राबवलेल्या मतदार नोंदणी शिबिरामुळे या वयोगटाच्या टक्केवारीत वाढ झालेली दिसून येते.

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमापूर्वी जुलै ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत घरोघरी सर्वेक्षणाची मोहीम राबवण्यात आली. या सर्वेक्षणात आढळलेल्या मृत मतदार, कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, तसेच दुबार मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्याची कार्यवाही पुनरीक्षणपूर्व कालावधीत तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कालावधीत पूर्ण करण्यात आली. त्यानुसार ११ लाख ६० हजार ६९६ मृत मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली. त्यापैकी ऐंशीपेक्षा अधिक वय असलेले ४ लाख ९२ हजार ३९५ मतदार मृत झाले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्याची नावेही वगळण्यात आलेली आहेत, त्याचप्रमाणे मतदार याद्यांमध्ये ९ लाख ०५ हजार ५५९ एकसारखे फोटो असलेले मतदार (फोटो सिमिलर एन्ट्रीज, झ्डए) असल्याचे निदर्शनास आले, त्यांची सखोल तपासणी करून विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कालावधीत २ लाख ८४ हजार ६२० मतदारांच्या नावांची वगळणी करण्यात आली आहे. तसेच मतदार यादीत नाव व इतर काही तपशील समान असलेले (डेमोग्राफिकल सिमिलर एन्ट्रीज उइए) २ लाख ५४ हजार ४६० मतदार आढळून आले. त्यांची सखोल तपासणी करून ७४ हजार ४२६ मतदाराची नावे वगळण्यात आलेली आहेत. ही वगळणी प्रक्रिया मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत संबंधित मतदाराच्या गृहभेटी घेऊन, स्पीड पोस्टने नोटिसा पाठवून, तसेच पूर्ण तपासणी-अंती कायदेशिररीत्या करण्यात आलेली आहे. नाव वगळणीच्या या प्रक्रियेमुळे मतदार यादीतील अनावश्यक फुगवटा नाहीसा होऊन आता ती अधिक परिपूर्ण झालेली आहे.

यंदाच्या पुनरीक्षण कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, भटक्या व विमुक्त जमातीच्या मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या शिबिरामध्ये मतदार नोंदणीबरोबरच आधारकार्ड, रेशनकार्ड, जातीचा दाखला यांचेही या जमातीतील लोकांना वाटप करण्यात आले, नाशिक, वाशीम, हिंगोली, कोल्हापूर, ठाणे, नांदेड, पुणे, सातारा, अहमदनगर, बीड, यवतमाळ, नागपूर, अकोला, धाराशिव, जालना, सोलापूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, वर्धा, अमरावती, सांगली, चंद्रपूर या जिल्ह्यामध्ये ही शिबिरे घेण्यात आली होती. त्यामध्ये भटक्या व विमुक्त जमातीच्या एकूण १६ हजार ४४३ लोकांची मतदार नोंदणी करण्यात आली.

यंदाच्या अंतिम मतदार यादीत कातकरी (काथोडी), माडिया गोंड, कोलाम या समूहातील ३८,८७६ मतदारांचा समावेश आहे. दिव्यांग मतदारांना ये-जा करण्याच्या दृष्टीने २०२४च्या लोकसभा निवडणुकीमध्ये सर्व मतदान केंद्रे तळमजल्यावर आणण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. शहरी मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी येत्या लोकसभा निवडणुकीत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे या मोठ्या शहरांतील १५० मतदान केंद्रे ही मोठ्या गृहनिर्माण संकुलामध्ये ठेवण्यात आलेली आहेत, त्यामुळे शहरी भागातील मतदानाचा टक्का काही प्रमाणात वाढेल, अशी अपेक्षा आहे. २३ जानेवारी रोजी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

मतदारांनी 'मतदाता सेवा पोर्टल' या संकेतस्थळावर (https://electoralsearch.eci.gov.in/) जाऊन यादीत आपले नाव तपासावे. तसेच यादीत नाव नसलेल्या नागरिकांनी सहा क्रमांकाचा अर्ज भरून आपला मताधिकार सुनिश्चित करावा, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देशपांडे यांनी केले.

### स्थानिक 'शिवप्रेमीं'च्या सहकार्य,

आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस जुन्नरचे आमदार अतुल बेनके, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए., जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख (दूरदृश्यप्रणालीद्वारे), पर्यटन विभागाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील मावळ्यांना संघटीत करुन रयतेचे स्वराज्य स्थापन केले. लोककल्याणकारी राजाचा आदर्श प्रस्थापित केला. महाराष्ट्राची अस्मिता जागवून अटकेपार झेंडा लावण्याची, दिल्लीच्या तख्ताला धडक देण्याची हिंमत, ताकद त्यांनी महाराष्ट्राला दिली. अशा युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव त्यांच्या कर्तृत्वाला साजेसा व्हावा. पर्यटन विभागाच्यावतीने दि. १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किल्ले शिवनेरीवर घेण्यात आलेला 'महादुर्ग' महोत्सव यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था, विविध सामाजिक, स्वयंसेवी संघटनांच्या प्रतिनिधींशी समन्वय साधून त्यांच्या सूचनाही विचारात घ्याव्यात. यंदाच्या महोत्सवाला भेट देणाऱ्या शिवप्रेमी व दुर्गप्रेमींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने कायदा सुव्यवस्था राखण्यासंदर्भातही उपाययोजना करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिल्या. तरुण पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख करुन देण्यासाठी तसेच देशी-विदेशी पर्यटकांमध्ये राज्यातील गड-किल्ल्यांविषयी आकर्षण निर्माण करण्यासाठी तसेच राज्यातील पर्यटन स्थळे, कला संस्कृती व पाककृती यांचे दर्शन घडविण्यासाठी महादुर्ग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पर्यटन सचिव डॉ. जयश्री भोज यांनी बैठकीत दिली.

### कॅप्टिव्ह मार्केट योजना : साडी

२४ लाख ८० हजार ३८० कुटुंबांना होणार आहे. कॅप्टिव्ह मार्केट योजनेअंतर्गत साडी वाटप होणार आहे. त्याचे वस्त्रोद्योग आणि अन्न नागरी पुरवठा विभाग यांनी कालबद्ध नियोजन करून १ फेब्रुवारी २०२४ पासून साडी वाटप सुरू होईल आणि सर्वांना लाभ मिळेल, असे जिल्हानिहाय नियोजन करावे, अशा सूचनाही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी बैठकीत दिल्या.

## पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे पिकअप पलटी होऊन एक ठार व १४ जखमी

पंढरपूर/प्रतिनिधी: दि २२ जानेवारी येणाऱ्या पिकप चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी पलटी होऊन समोरून येणाऱ्या मिनी ट्रॅव्हल्स वर आदळी या अपघातात एक जन जागीच ठार व १४ जखमी यामध्ये अधिक माहिती अशी की सोमवारी २२ रोजी सकाळी पंढरपूर कडून पुण्याकडे जाणारी देवदर्शन करून मिनी ट्रॅव्हल्स एम एच १४ ४५ ५४ असेल बोसे गावाजवळील देवान मळा येथे आले असता कर्क म्हणून येणारे पांढ्या रंगाची पिकप एम एच १३ सी यु ९४ ६१ या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने जगात पलटी झाल्याने गाडी घसरत पंढरपूर कडून पुण्याकडे जाणारी ट्रॅव्हल्स वर जाऊन आढळले पिकप मध्ये असणारे मालाची पोती पडल्याने प्रवासी जखमी झाले



या अपघातात जखमी झालेल्या चालकास व अन्य प्रवाशांना भोसे ग्रामस्थ व करकम पोलीस अपघात पथकातील कर्मचारी व नाईक मयूर गव्हाणे यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन जखमींना पंढरपूर येथील रुग्णालयात कल केली या अपघातात गोटूलाल नटवरलाल सेनानी वय ३० गोविंद आणि बडवानी मध्य प्रदेश हा जागीच ठार झाला याबाबत मिनी ट्रॅव्हल्स चालक राजेंद्र भानुराव गडेकर राहणार शिवराज नगर रहाटणी तालुका पुणे याने करकम पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनास्थळी करकम पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर व पोलीस उपनिरीक्षक यांनी भेट देऊन अपघाताची पाहणी केली सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास चालू आहे

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# भगिनींचा आनंद हाच आशीर्वाद मानतो : चेअरमन अभिजीत पाटील

## मंगळवेढा तालुक्यातील मरवडे येथे 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम उत्साहात संपन्न



मंगळवेढा/प्रतिनिधीः 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम मोठ्या आनंदात आणि माता भगिनींच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. यातून त्यांना मिळणारा आनंद हाच मी आशीर्वाद मानतो, असे प्रतिपादन 'विठ्ठल सहकारी'चे चेअरमन अभिजित पाटील यांनी केले.

मंगळवेढा तालुक्यातील मरवडे येथे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वतीने 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बक्षीस वितरण समारंभात विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील बोलताना म्हणाले.... संसाराची जबाबदारी पेलून अविरत कर्तव्य पार पाडणाऱ्या माता भगिनींना विरंगुळ्याचे आणि एकत्रित आनंदाचे काही तास मिळावे यासाठी या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यास मिळणाऱ्या उस्फुर्त प्रतिसाद आणि सर्व वयोगटातील सहभाग यामुळे प्रत्येक गावात हा कार्यक्रम यशस्वी होत आहे. 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाला मरवडे येथे उस्फुर्त प्रतिसाद.. शेकडो महिलांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेतला आणि उत्कृष्ट संयोजनातून विलक्षण आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या सर्व खेळामध्ये प्रथम क्रमांकाच्या विजेत्या सौ.अश्रिवनी नागेश मोरे, व्दितीय सौ.मनिषा अतुल गवळी, तृतीय सायली बालाजी पवार, तर सौ. सुजाता दशरथ गणपाटील या चतुर्थ क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. सर्व विजेत्यांना आकर्षक पारितोषिके अभिजीत पाटील यांनी वितरीत केली. कार्यक्रमाचे निवेदिका मोनिका जाजू यांनी केले.

यावेळी मरवडे येथील मा.सरपंच दादासाहेब पवार, सरपंच पुनम मासाळ, उपसरपंच दिक्षा शिवशरण, इंडियन रेल्वे झडख, दामोदर घुले वस्ताद, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सरचिटणीस दादासाहेब भगरे,साहेबराव पवार सर, माजी विस्तार अधिकारी डॉ.माणिक पवार, प्राचार्य हेमंत वगरे, सुभाष भुसे सर, संभाजी रोंगे सर, अंबादास पवार सर, डॉ.अजित डांगे, सुभाष शिवशरण, निखिल कुलकर्णी, माळी सर, काशिद सर, गोविंद चौधरी, बसवराज येंडसे, रतीलाल केंगार, शहाजी पवार सर , श्रीकांत मेलगे, विलास काळे, समाधान जाधव (महाराज) यांच्यासह मरवडे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते...

# ईटकूर येथे हळदी-कुंकू कार्यक्रमास मोठा प्रतिसाद




कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील ईटकुर येथील जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळेत मकर संक्रांती निमित्त आयोजित केलेल्या हळदी-कुंकवाच्या कार्यक्रास उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळाला आहे.टकूर येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मकर संक्रांती निमित्त माता पालकांचा हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून मुख्यध्यापीका श्रीमती मुंढे उपस्थिती होत्या. यावेळी इयत्ता पहिली ते चौथीच्या माता पालकांनी व अंगणवाडी ताई गावातील प्रतिष्ठीत महिला यांनी भरपूर प्रतिसाद दिला यावेळी मोठ्या प्रमाणात महिलांनी सहभाग घेतला .यावेळी प्रत्येक महिलेनी उखाणे घेतले. तसेच गवळणी, भारूडे गीत गायन करून मंत्रमुग्ध केले.या कार्याक्रमासाठी मुख्याध्यापिका .श्रीम शारदा मुंढे लाटे ,श्रीमती शिंदे , श्रीमती गायकवाड मॅडम यांनी कार्यक्रम उत्कृष्ट रित्या पार पाडला. यावेळी श्रीम मुंढे मॅडम यांनी मातांना प्रबोधन पर माहिती सांगितली शेवटी श्रीम गायकवाड यांनी आभार मानले

# नळदुर्ग येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वस्तीगृहात अजब कारभार

## चक्क विद्यार्थांना नासलेली फळे व निकृष्ट दर्जाचे भोजन , प्रशासनाचे दुर्लक्ष ठेकेदारावर कारवाईची मागणी

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वस्तीगृह तेथील कर्मचाऱ्यांचा अजब कारभार उघडकीस आला याच वस्तीगृहात विद्यार्थांना भोजनाचे तिन तेरा नऊ आठरा झाले आहे शिवाय विद्यार्थ्यांना चक्क नासकी व कुजकी फळे खान्यासाठी देतात हा सर्व प्रकार उघडकीस आला आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय वस्तीगृह आसुन आडथाळा , नसुन खोळंबा ही म्हण खरी ठरली आहे .






नळदुर्ग येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या सोईसाठी महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग डॉ बाबासाहेब आंबेडकर शासकीय मागासवर्गीय शासकीय वस्तीग्रह खूप चांगल्या पद्धतीने महाराष्ट्र शासनाने केलेल्या असून या शासनाच्या योजनेला शासनाच्या कर्मचाऱ्यांनीच चुना लावण्याचे काम करत आहेत निकृष्ट दर्जाचे कडधान्य रेशनचे तांदुळ देऊन ठेकेदाराने चक्क शासनाची फसवणूक केली आहे व विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन व्यवस्था आसल्याने विद्यार्थांचे आरोग्य धोक्यात येण्यास वेळ लागणार नाही आशा संबंधित गुत्तेदारावर ठेकेदारावरती प्रशासनाने कारवाई करावी आशी मागणी नागरिकांना होत आहे .

या वस्तीगृहात ४७ विद्यार्थ्यांचा प्रवेश असला तरी फक्त काही विद्यार्थी त्या ठिकाणी उपस्थित राहातात बाकीचे विद्यार्थी कुठे आहेत याकडे कर्मचार्यांचे दुर्लक्ष दिसत आहे, विद्यार्थ्यांना जेवणाचे आणि फळांचा निकृष्ट दर्जाचा जर वापर होत असेल तर मग या ठेकेदारावरती कारवाई करावी की जेणेकरून विद्यार्थ्यांचे आरोग्य आणी ठेकेदाराचा हलगर्जीपणा प्रशासनाच्या दुर्लक्षा मुळे हे ठेकेदाराचा मज्जाव दिसत आहे एखदा गोड पदार्थ खाण्यासाठी देतात मौसाहारी जेवण हे निकृष्ठ दर्जाचे मिळत आसल्याने विद्यार्थामध्ये ही नाराजीच सुर देत काहीनी भावना व्यक्त केल्या आहेत .

वस्तीगृहात कडधान्य किंवा किरणा मालाचा पुरवठा करणाऱ्या व भातासाठी लागणार्या तांदूळ हा रेशनचा पुरवठा केला जातो आहे आसे स्वयपांक गृरातील कर्मचार्याने माहिती दिली आहे याच बरोबर भाजीपाला , मटन, चिकन व फळाचा पुरवठा करणारा ठेकेदार हा बिडचा आसुन देण्यात येणारा नासका फळाचा बाजार हा बंद करण्यासाठी ठेकदाराची ठेकेदरी बंद करायला हवी या साठी युवक नागरीकानी पुढाकार घ्यायला हवा गोडा पदार्थांच्या गुलाब जामुन कच्च्या प्रमाणात उपलब्द करतात आशा खाण्याने विद्यार्थांचे आरोग्य धोक्यात येण्याची दाट शक्यता आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शासकीय मुलांचे वस्तीगृहातील कर्मचारी कनिष्ठ लिपीक टंकलेखक मोटे बी आर , शिपाई विभुते एल के , स्वयंपाकी गोरे आर बी , चव्हाण एम झेड , जाधव के बी , मदतनिस काकडे एम एन अदिजन आसुन तेथील अधिक्षक काही दिवस रजेवर असल्याने त्या वस्ती गृहाचा प्रमुख मोटे यांच्या कडे आसुन आशा निष्काळजी करणाऱ्या कर्मचार्यावर प्रशासनाने कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे .

याबाबत समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी समिती गठीत करून वरिष्ठ चौकाशी करावी या आगोदर आसाच प्रकार घडला होता परंतू समाज कल्याण विभागाचे अधिकारी येऊन चौकशी करून थातूर मातूर कारवाई केली होती हे प्रकरण तिथेच बंद करण्यात आले होते परंतु आसाच प्रकार आज ही घडत आसल्याचे उघडकीस आले आहे . कर्मचारी व ठेकेदारांनी विद्यार्थांच्या जिवाशी खेळण्याचा प्रयत्न चालू आसल्याचे सांगण्यात आले आहे खराब अन्न व नासलेली पदार्थ खाण्यासाठी दिल्यास आर्धे अन्न वाया जात आसल्याचे निदर्शनास आले आहे .

जे कर्मचारी या ठिकाणी नेमलेले आहेत तेच या घटने ला जबाबदार आसल्याचे संशय व्यक्त करण्यात येत आहे या विषयी अधिकारी यांनी गंभीर दखल घेऊन कारवाई करण्यात यावी आशा प्रकाराचा सावळा गोंधळ कधी बंद होणार आसुन याकडे विद्यार्थी व पालका तुन नाराजी व्यक्त करण्यात आली आहे . हे सर्व पाहाता ठेकेदाराला संबधीत विभागाचा आभय आसल्याचे दिसुन येत आहे आशा प्रकारचा संशय व्यक्त केला जातोय परंतू शासकीय स्तरावर कोणती कारवाई केली जाईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

# शेळवे येथे तालुका विधी सेवा समितीचे कायदेविषयक शिबीर संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या जानेवारी २०२४ मधील किमान समान शिबीर कार्यक्रमातर्गंत तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर व अधिवक्ता संघ,पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने



सनराइज् पब्लिक स्कूल, शेळवे (ता.पंढरपूर) येथे कायदेविषयक शिबीर संपन्न झाले.

तालुका विधीसेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम.बी.लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाणी न्यायाधीश एन. एस. बुद्रुक यांच्या अध्यक्षतेखाली सनराइज् पब्लिक स्कूल, शेळवे (ता.पंढरपूर) येथे कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी न्यायाधीश एन. एस. बुद्रुक, यांनी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीना शिक्षणाचा अधिकार, पोक्सो कायदा, तसेच रस्ता सुरक्षाबाबतचे ज्ञान याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अधिवक्ता संघाचे सचिव ड. राहुल बोडके यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन गायकवाड व प्रस्ताविक अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड.अर्जुन पाटील यांनी केले तर आभार अधिवक्ता संघाचे उपाध्यक्ष ड. शशिकांत घाडगे यांनी मानले.सदर कार्यक्रमास ॲड. शिवराज पाटील, ॲड. संतोष नाईकनवरे , ॲड. राहुल भोसले, ॲड. सागर गायकवाड, शाळेचे संस्थापक श्री. समाधान गाजरे तसेच न्यायालयीन कर्मचारी. के.के.शेख, व्ही.एस. कणकी, व्ही. आर.चुंबळकर, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर व निर्मिती करु नये; जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास व निर्मितीस मनाई आहे. भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापर व निर्मिती करण्यात येऊ नये असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

राष्ट्रध्वजाविषयीचे प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता विद्यार्थी नागरिकांकडूनदेखील राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज विविध सार्वजनिक ठिकाणी टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. रस्त्यात इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज बरेच दिवस नष्ट होत नाहीत. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे.. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे. खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. तसेच भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देवून, नागरिकांनी ध्वज संहितेच काटेकोर पालन करावे असे आवाहनही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा विविध प्रश्नांसाठी २५ जानेवारी रोजी येथील चौकात रास्ता रोको

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे व पंढरपूर बंधाऱ्यातील असणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेती व पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असून महावितरण कंपनीच्या कार्यालयाकडून शेतकऱ्यांना कोणतेही पूर्ण कल्पना न देता विद्युत पुरवठा अचानक फक्त दोन तास सुरू ठेवल्याने शेती पिकाची व जनावरांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याने या प्रश्नाबाबत पंढरपूर स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या वतीने शेतकऱ्यांच्या प्रश्न सोडवण्यासाठी भटुंबरे येथील अहिल्या चौकात हजर शेतकऱ्यांच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सोलापूर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष सचिन आटकळे यांनी पंढरपूर तहसीलदार यांच्याकडे एक प्रसिद्धी पत्रकार दिले

सचिन आटकळे यांनी प्रसिद्ध पत्रकार म्हटले आहे की गुरसाळा व पंढरपूर गुरसाळे शिरढून चिंचोली भोसे भटुंबरे येथील हजारो शेतकरी शेतीवर आपली उपजीविका करीत आहेत त्यातच आत्ताच निसर्गाचे उन्हाचे चटके बसत असतानाच येथील विद्युत मंडळाने कोणतीही पूर्ण कल्पना न देता विद्युत पुरवठा दोन तास खंडित करून चटके देण्यास सुरुवात केली आहे त्यामुळे शेती व जनावरांचे पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात हाल होत आहे सध्या उजनी धरणातून भीमा नदीत पाणी मुबलक प्रमाणात सोडण्यात आले आहे या शेतकऱ्यांना कसलाही फायदा होत नाही परंतु विद्युत मंडळाने विद्युत पुरवठा खंडित केल्यामुळे शेतकऱ्यांची पिके पाण्याअभावी धोक्यात आले आहे

तरी संबंधित विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पंढरपूर गुरसाळे बंधाऱ्यावरील विद्युत पुरवठा आठ तासपूर्वक करा व शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळावे अशी मागणी विकाराध्यक्ष सचिन आटकळे यांनी केले आहे

तसेच तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दुधाचे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर त्वरित जमा करण्यात यावी इत्यादी मागणी लेखी निवेदनाद्वारे दिल्या असून संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्या मान्य न केल्यास गुरुवार दिनांक २५ रोजी सकाळी अकरा वाजता पंढरपूर टेंभुर्णी मार्गावरील बटुंबरे चौकात हजारो शेतकऱ्यांच्या समवेत रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा गर्भित इशारा सचिन आटकळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे

यावेळी निवेदन देताना रमेश पवार सुहास पवार सुदाम पवार रामचंद्र कारंडे सचिन घोडके पंकज करनेरकर इत्यादी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पंढरपूरची कु अंतरा कौलगे हिने पटकावलेले रोपे पदक तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष पंडित शेंबडे यांच्या हस्ते सत्कार

पंढरपूर/प्रतिनिधीः पुणे बालेवाडी येथे नुकत्याच पार पडलेल्या ३३ व्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर तायक्कांदो स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यामधील पंढरपूर तालुक्यातील अरिहंत पब्लिक स्कूल तसेच दिव्या स्पोर्टस क्लब मधील कु अंतरा मारुती कौलगे हिने रोप्य पदक प्राप्त केले आहे याबद्दल पंढरपूर तालुका तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष पंडित दादा शेंबडे यांनी मिळालेले यशाचे कौतुक करून सन्मान केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या या स्पर्धेत राज्यातील २९ जिल्ह्यातील समाज होता यामधून हे संपादन केले आहे यावेळी तायक्कांदो असोसिएशन पंढरपूरचे उपाध्यक्ष मयूर वागत पंढरपूर तालुका तायक्कांदो असोसिएशनचे सचिव तसेच दिव्या स्पोर्ट्स क्लबचे संचालक महेश गावडे अतिश टाके कर सहसचिव तायक्कांदो असोसिएशन पंढरपूर यावेळी हाऊस ऑफ कॉम्प्युटर एचपी शोरूमचे मालक पंढरी बागल मारुती कौलगे अंकुनुरी अंकुनुरी सर गणेश देशमुख यावेळी आदी मान्यवर उपस्थित होते



# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे याना अक्कलकोट शिवसेनेच्या वतीने विनम्र अभिवादन

अक्कलकोट/प्रतिनिधीः हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब यांच्या जयंतीनिमित्त अक्कलकोट तालुका शिवसेनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे यांच्या हस्ते हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस हार घालुन अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना विधानसभा संघटक प्रा.सुर्यकांत कडबगावकर शहर संघटक चंद्रकांत वेदपाठक शहरप्रमुख योगेश पवार महिला आघाडी तालुकाप्रमुख सौ वर्षाताई चव्हाण शहरप्रमुख वैशाली हावनूर उपप्रमुख सौ.ताराबाई कुभांर. परशुराम जाधव व इतर शिवसैनिक उपस्थित होते



# नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित्त बार्टीत विनम्र अभिवादन



पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी थोर स्वतंत्र सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, श्रीमती वृषाली शिंदे, शुभांगी पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विभागप्रमुख डॉ चव्हाण यावेळी बोलतांना म्हणाले की आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली . तिच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्यलढा उभा केला जेव्हा जहाल आणि मावळ विचारधारा कार्यरत होत्या तेव्हा जहाल मतवादाचा पुरस्कार नेताजींनी केला .आज या डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमध्ये या महामानवाला अभिवादन करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे . कारण नेताजीचा व बाबासाहेबांच्या भेटीचा यामागे संदर्भ आहे .प्रबोधनकार ठाकरे यांचा वारसा आणि वसा लाभलेले हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची आठवण सांगताना डॉ चव्हाण यांनी पशुवैद्यकीय महाविद्यालयात शिकत असताना पशुवैद्यकांच्या मागण्या संदर्भात भेटीचा योग आला होता त्या वेळेसच्या त्यांच्या मार्मिक टिप्पणीची आणि विनोदी स्वभावाची आठवण करून दिली .त्याचप्रमाणे प्रबोधनकार ठाकरे यांचे देवळांचा धर्म की धर्म देवळांचा या प्रभावी पुस्तकाचे वाचन करण्याचे सर्वांना आवाहन केले . प्रकल्प व्यवस्थापक डॉ प्रेम हनवते यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची २२ जुलै १९४० रोजी भेट झाली असल्याचे सांगून नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्याला अभ्यासपूर्ण मनोगतातुन उजाळा दिला . याप्रसंगी लेखाधिकारी योगिता झानपुरे, कार्यालय अधिक्षक सचिन जगदाळे, प्रज्ञा मोहिते यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शासकीय जागेवर घरकुल बांधण्याची परवानगी मिळावी असे ठराव कार्यकर्ते यांनी ग्रामसभेमध्ये करून घ्यावेत : अविनाश मडिखांबे

अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार डॉ ना रामदासजी आठवले यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष माजी ना राजाभाऊ सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट तालुक्यातील गायरान जमिनीवर निराधार,भूमिहीन, शेतमजूर,दलित, आदिवासी,भटके मुक्त, लोकांचे शेत जमिनीचे तसेच घराचे केलेल्या अतिक्रमण नियमित करणे, असा ग्रामसभेत ठराव करणे.



गावठाण व इतर शासकीय जागेतील उताऱ्यावर ग्रामपंचायत दप्तरी भोगवटदर अशी असणारी नोंद रद्द करावी. त्याच ठिकाणी मालक सदरी नोंद करून त्या जागेवरती घरकुल बांधकामासाठी परवानगी मिळावी.असे ठराव दि.२६जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी ग्रामपंचायतीमध्ये होणार्या ग्रामसभेमध्ये खालील प्रमाणे ठराव आरपीआय आठवले पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मंजूर करुन घ्यावेत.

अ ) गायरान जमिनीवर निराधार भूमिहीन शेतमजूर दलित आदिवासी भटके विमुक्त गोरगरीब लोकांची शेतजमीनीचे तसेच घरांचे केलेले अतिक्रमण नियमित करणे बाबत ग्रामसभेत ठराव ब ) भूमिहीन बेरोजगारांना, ग्रामस्थांना ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय पडिक भुखंड कसण्यासाठी, उदरनिर्वाह करण्यासाठी मंजूर करणे बाबत ग्रामसभेत ठराव (अ व ब हे दोन्ही ठराव वेगवेगळे असून ग्रामसेवक यांना ग्रामस्थांकडून करण्यात येणाऱ्या अर्जात अतिक्रमन धारकांची, लाभार्थी नावे टाकणे आवश्यक आहे ) अशी माहिती पत्रकारांशी वार्तालाप करताना रिपाइं आठवले अक्कलकोट तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी दिली.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यात सकाळी ९.१५ वाजता ध्वजारोहणाचा मुख्य सोहळा

मुंबई : भारताच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त शुक्रवार २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ९.१५ वाजता ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यात एकाच वेळी म्हणजे सकाळी ९.१५ वाजता होणार आहे. याबाबतचे परिपत्रक राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने आज निर्गमित केले.



या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० वाजेच्या दरम्यान ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय, अर्धशासकीय समारंभ आयोजित करून नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असेल, त्यांनी तो समारंभ सकाळी ८.३० वाजेच्यापूर्वी किंवा सकाळी १० वाजेनंतर करावा.

मुंबई येथील शिवाजी पार्क, दादर येथे राज्यपाल रमेश बैस हे भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या प्रमुख कार्यक्रमास उपस्थित राहून ध्वजारोहण करतील. विभागीय व जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी पुढील प्रमाणे संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री, मंत्री ध्वजारोहण करतील (अनुक्रमे मा. पालकमंत्री, मा. मंत्री यांचे नाव आणि ध्वजारोहण करण्यात येणाऱ्या जिल्ह्याचे नाव या क्रमाने). देवेंद्र फडणवीस- नागपूर, अजित पवार- पुणे, राधाकृष्ण विखे पाटील- अहमदनगर, सुधीर मुनगंटीवार- चंद्रपूर, दिलीपराव वळसे पाटील- बुलढाणा, डॉ. विजयकुमार गावित- भंडारा, हसन मुश्रीफ- कोल्हापूर, अब्दुल सत्तार- हिंगोली, चंद्रकांत पाटील- सोलापूर, गिरीश महाजन- धुळे, सुरेश खाडे- सांगली, तानाजी सावंत- धाराशीव, उदय सामंत- रत्नागिरी, दादाजी भुसे- नाशिक, संजय राठोड- यवतमाळ, गुलाबराव पाटील- जळगाव, संदिपान भुमरे- छत्रपती संभाजीनगर, धनंजय मुंडे- बीड, रवींद्र चव्हाण- सिंधुदुर्ग, अतुल सावे- जालना, शंभूराज देसाई- सातारा, मंगल प्रभात लोढा- मुंबई उपनगर, धर्मरावबाबा आत्राम- गोंदिया, संजय बनसोडे- लातूर, अनिल पाटील- नंदुरबार, दीपक केसरकर- ठाणे, आदिती तटकरे- रायगड.

इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अनुक्रमे संबधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी ध्वजारोहण करतील, तथापि, राष्ट्रध्वजारोहण करणारे मा. मंत्री अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित राहू न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिका-यांनी राष्ट्रध्वजारोहण करावे व ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी. तसेच संबंधित प्रांताधिकारी, तहसीलदार हे अनुक्रमे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालयी ध्वजारोहण समारंभाच्या ठिकाणी शासकीय कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

राज्यात या दिवशी सर्व शासकीय व सार्वजनिक इमारतींवर, किल्लयांवर, तसेच जिल्ह्यांमध्ये ऐतिहासिक महत्वाच्या ठिकाणी राष्ट्रध्वज उभारावेत. राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक दि. ५ डिसेंबर, १९९१, ११ मार्च, १९९८ रोजी दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे पालनाची दक्षता घ्यावी. प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाला सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा, यासाठी वेबसाईटद्वारे थेट प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करावा.

दिवसभरातून वृक्षारोपण, आंतर शालेय/आंतर महाविद्यालयस्तरावर वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा/ देशभक्तीपर निबंध व कविता स्पर्धांचे आयोजन करावे. प्रभात फेऱ्या काढण्यात याव्यात. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात यावे. महत्वाच्या योजनेचा शुभारंभ करावा, शासकीय इमारतीवर विद्युत रोषणाई करावी, एनएसएस व एनवायकेएसद्वारे देशभक्तीपर मोहीम राबवावी.

काही ठराविक जिल्ह्यांमध्ये निवडणूक आचारसंहिता अंमलात असल्यास सर्व संबंधितांना यासंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात याव्यात, त्यात ध्वजारोहणाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. कार्यक्रमाचा राजकीय व्यासपीठासारखा वापर करु नये. मा. पालकमंत्री हे भाषण करणार असल्यास त्यांच्या भाषणाचा आशय ऐतिहासिक मान्यवरांचे कार्य आणि कर्तृत्व, बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरतेच मर्यादित असावे, असेही या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# मौखिक आरोग्यविषयक जनजागृती व्हावी : वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई : मौखिक आजारांचा प्रार्दुभाव वाढत आहे. तंबाखूजन्य पदार्थ सेवनामुळे कर्करोगाचे रुग्ण दिसत आहेत. यासाठी जनजागृती महत्त्वाची असून मौखिक आरोग्यविषयक जनजागृती व्हावी, असे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य, विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले

फिरते दंत रुग्णालय हे शासनाच्या निधीतून झाले असून या रुग्णालयास जिल्हा नियोजन समिती, मुंबई शहर यांनीही सहकार्य केले आहे. मंत्री श्री. मुश्रीफ यांच्या हस्ते सुसज्ज फिरते दंत चिकित्सालयाचे लोकार्पण आणि या चिकित्सालयाच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन दंत वैद्यकीय महाविद्यालयात झाले.यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सहसंचालक डॉ. विवेक पाखमोडे महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. वसुंधरा भट, सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख संध्या डॉ.चव्हाण यांची उपस्थिती होती.




मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले की, नाविन्यपूर्ण आधुनिक सुविधा असलेले सुसज्ज फिरते दंत रुग्णालय ‘स्टेट ऑफ आर्टस’ या आधुनिक संकल्पनेवर आधारित आहे. त्यामुळे थेट जनतेपर्यंत पोहोचवून आधुनिक सेवा प्रदान करणे सहज शक्य होईल.प्राथमिक मौखिक आरोग्य सुविधा तसेच उत्तम उपचार अधिकाधिक सुलभ करून फिरते दंत चिकित्सालयाद्वारे जनतेपर्यंत पोहोचून सेवेचा अभाव असलेल्या दुर्गम भागांमध्ये जास्तीत जास्त सेवा पुरवावी व मौखिक रोगांचे प्रमाण कमी करावे. तसेच जनतेस मौखिक आरोग्याबद्दल संवेदनशील करणे, तंबाखू व्यसनामुळे वाढणारे मौखिक कर्करोग यावर जनतेस जागरुक करून मौखिक कर्करोगावर नियंत्रण आणणे हे सामाजिक दंत शास्त्र विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय मुंबई यांनी करावे.शासकीय दंत महाविद्यालय व रुग्ण्यालय, मुंबई येथील सामाजिक दंत शास्त्र विभाग अधिक अधिक जनतेपर्यंत पोहोचून सेवा प्रदान करण्यासाठी शासन पूर्ण सहकार्य करेल, असेही मंत्री श्री. मुश्रीफ यांनी यावेळी सांगितले.

सुसज्ज फिरते दंत चिकित्सालयाची माहिती

दंतचिकित्सालयात आधुनिक पद्धतीच्या दोन दंत खुर्च्या व यंत्रणा असून रुग्ण सेवेसाठी तत्पर आहे. फक्त मौखिक तपासणी व उपचार या करिताच नव्हे, तर आधुनिक उपचार पद्धती यंत्रणा जसे की पोर्टेबल एक्सरे युनिट, कर्करोग तपासणी, त्वरित आरोग्य चाचणी सुविधा यांनी सुसज्ज आहे. ज्यामुळे रुग्णांचे जागीच निदान करून त्वरित उपचार सेवा देणे सोपे होईल. दातांची कीड यावर उपचार व प्रतिबंध, हिरड्यांचे आजार यावर उपचार, रूट कॅनॉल उपचार, मौखिक कर्करोग तपासणी, व्हीडिओद्वारे रुग्णांचे मौखिक आरोग्य संबंधित जागरूकता, तंबाखू व्यसन समुपदेशन या सेवा पुरविल्या जातील. यावेळी श्री.निवतकर, डॉ. पाखमोडे, डॉ. भट यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संध्या चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन अब्रार सय्यद यांनी केले, तर आभार प्रियांका मचाले यांनी मानले.

# स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ‘विशेष श्रमसंस्कार शिबिरा’चे मुंढेवाडीमध्ये उद्‌घाटन



पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.२२ जानेवारी २०२४ पासून ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत मुंढेवाडी (ता. पंढरपूर) मध्ये ‘विशेष श्रमसंस्कार शिबिरा’चे आयोजन केले असून ‘युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास’ हे या शिबिराचे ब्रीदवाक्य आहे. या श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन मुंढेवाडीचे सरपंच हणमंत घाडगे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती यांच्या नेतृत्वाखाली व कार्यक्रम अधिकारी प्रा. रविकांत साठे, डॉ. धनंजय चौधरी व डॉ. एम. एम. अवताडे यांच्या समन्वयातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अभियांत्रिकी महाविद्यालयातील जवळपास २०० विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते. हे शिबिर आठवडाभर चालणार असून या शिबिरांतर्गत विविध उपक्रम होणार आहेत. या शिबिरामध्ये श्रमदान, चित्रकला, निबंध स्पर्धा, वृक्ष लागवड, मतदार जनजागृती, पर्यावरणाचा विकास, महिला आरोग्य विषयक समस्या व उपाय, शिक्षण, स्वच्छता अभियान आदी विषयांवर प्रबोधन व मार्गदर्शन होणार आहे. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरवात झाली. स्वेरी अभियांत्रिकीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी प्रास्तविकात ‘मुंढेवाडी मध्ये ‘विशेष श्रमसंस्कार शिबिर’ आयोजित करण्याचा हेतू स्पष्ट केला. उदघाटन प्रसंगी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की ‘विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थी हा परिपूर्ण घडत असतो. श्रमसंस्काराच्या माध्यमातून विद्यार्थी व त्यांचे राहणीमान, संस्कार, वर्तन, माणुसकी, यात बदल होतो व व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी योग्य संधी मिळते. हेच संस्कार विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी जीवनामध्ये करिअर करण्यासाठी अत्यंत उपयोगी पडतात. त्याचबरोबर मुंढेवाडी आणि स्वेरी यांचे असे नाते अतिशय आत्मियतेचे आहे.’ असे प्रतिपादन केले. पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुदाम मोरे यांनी ‘स्वेरीच्या विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या जनजागृती मुळे गावात एक उर्जा निर्माण होत असते. गेल्यावेळी त्यांनी संपूर्ण मुंढेवाडी गावात शिक्षण, स्वच्छता, आरोग्य यासारख्या अनेक विषयावर प्रबोधन केल्याचे सांगून स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य अप्रतिम होत असल्याचे आवर्जून सांगितले. सात दिवस स्वेरीचे विद्यार्थी हे गावामध्ये स्वच्छता, श्रमदान या बरोबरच बालविवाह निर्मूलन, मतदार जनजागृती, जल व्यवस्थापन, पर्यावरण जनजागृती, कचरा व्यवस्थापन यावर देखील कार्य करणार आहेत. यावेळी उदघाटन प्रसंगी उपसरपंच सौ. रेखा अभिमान मोरे, पांडुरंग सह. सा. कारखाना, श्रीपूरचे संचालक सुदाम बापु मोरे, पोलीस पाटील सौ. राणी शरद मोरे, माजी सरपंच पांडुरंग मोरे, हनुमंत शिंदे, तंटामुक्तीचे अध्यक्ष आण्णासाहेब मोरे, तंटामुक्तीचे सचिन रामचंद्र मोरे, भास्कर मोरे, सिद्धेश्र्वर मोरे, मधुकर मोरे, जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र डुबल, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खिलारे, तलाठी मुसाक काझी, ग्रामसेवक बालाजी एलेवाड, माजी सैनिक ज्योती नाना मोरे, दगडू तात्या मोरे, भारत मोरे, तानाजी मोरे यांच्यासह मुंढेवाडीतील ग्रामस्थ तसेच स्वेरी अभियांत्रिकीचे प्रा. के.एस.पुकाळे, प्रा. एस.बी.खडके, प्रा. बी.टी. गडदे, प्रा.जी.जी. फलमारी, प्रा.सौ. पी. व्ही. पडवळे, प्रा. मेघा सोनटक्के व इतर प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल पिसे यांनी केले तर डॉ. यशपाल खेडकर यांनी आभार मानले.

# कोटणुर येथील जाळपोळी च्या घटने नंतर कलबुर्गी जिल्हयात सर्वत्र शांतता

कलबुर्गी /महेश गायकवाड : कलबुर्गी शहरा पासुन अवघ्या २० किमी अंतरावर असलेल्या कोटनुर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची सोमवार दिनांक २२ जानेवारी रोजी रात्री डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आल्या नंतर कलबुर्गी शहरात व जिल्ह्यात निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आली असून जिल्हयात सर्वत्र शांतता असल्याचे कलबुर्गीचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी सुयश मीडिया ग्रुप शी बोलताना सांगीतले, कोटणूर तसेच कलबुर्गी शहरातील जाळपोळ आणि दगडफेक पुर्णपणे बंद झाली असून सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्यात आली आहे.



सोमवारी रात्री कलबुर्गी शहरा पासुन जवळच असलेल्या कोटणूर या गावात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची काही समाजकंटकांनी जय श्रीराम आणि जय जय राम असे म्हणत विटंबना केली होती या नंतर कलबुर्गी जिल्हयातील तमाम आंबेडकरी जनता तसेच ओबीसी एस सी एस टी मोयनारीटिज च्या तमाम संघटना एकत्र येत कलबुर्गी शहरात जागोजागी निषेध नोंदवित आंदोलन करून या घटनेतील जातीयवादी लोकांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आणि सर्वत्र रस्ते अडवून चौका चौकात आंदोलन सूरू केले.

यांनतर उशिराने पोलीस प्रशासनाने आरोपींवर तातडीने कारवाई करून अटक करण्यात येईल असे आश्र्वासन दिल्या नंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी बोलतांना आंबेडकरी आणि. ओबिसी नेत्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान सहन करून घेणार नाही या देशात फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा कायदा चालतो डॉ बाबासाहेब आंबेडकर हे एकटेच या देशाचे हिरो आणि नेते आहेत यापुढे जर असे प्रकार घडत राहिल्यास आम्हाला पेटून उठल्या शिवाय गत्यंतर नाही असे या वेळी नेत्यांनी सांगीतले

दरम्यान कलबुर्गी शहरातील परिस्थिती नियंत्रणात असुन सर्वत्र शांतता आहेः जनतेनी कोणत्याही अफवांवर आणि गोष्टींवर विश्र्वास ठेवू नये असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.